# नगरपरिषद प्रशासन संचालनालय

**प्रधानमंत्री स्वनिधी** /का.११ /२०२०-२१/1403
राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
३ रा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई, ३०.
दिनांक: १६ जुलै, २०२०

प्रति,

**आयुक्त, महानगरपालिका (सर्व)**

**मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत (सर्व)**

**विषय: "प्रधान मंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SWANidhi)" पथविक्रेत्यांसाठी विशेष सूक्ष्म पतपुरवठा सुविधा योजनेची अंमलबजावणी करणेबाबत.**

संदर्भ : १. केंद्र शासनाच्या PM street vendors AtmaNirbhar Nidhi (PM SVANidhi ) योजनेच्या मार्गदर्शक सूचना

२. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.पीएम स्वनिधी- २०२०/प्र. क्र. ७७/ नवि-२० दि. १७ /०६/२०२०

३. केंद्र शासनाचे पत्र क्र. D.O. No. K-१२०१७(३०)/२/२०२०-UPA-II-UD-part (I) dated १७/०६/२०२०

४.केंद्र शासनाचे पत्र क्र. K-१२०१७ (३०) / ९ / २०२०-UPA-II-UD dated २४/०६/२०२०

५. केंद्र शासनाचे पत्र क्र. File No. K-१२०१७(३०)/८/२०२०-UPA-II-UD(९०८९६७९) dated ३०/०६/२०२०

६. केंद्र शासनाचे पत्र क्र. File No. K-१२०१७(३३)/२/२०२०-UPA-II dated ०७/०७/२०२०

७. केंद्र शासनाचे पत्र क्र. File No. K-१२०१७(३३)/२/२०२०-UPA-II dated १०/०७/२०२०

महोदय/ महोदया,

केंद्रशासनाने **प्रधान मंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SWANidhi)" ही पथविक्रेत्यांसाठी विशेष** सूक्ष्म पतपुरवठा सुविधा योजना घोषित केली असून त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्याआधारे राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने उपरोक्त संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक १७ जून, २०२० च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये प्रधान मंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेची अंमलबाजवणी करण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये योजनेचे उद्दीष्ट, लाभार्थी निकष, लाभचा तपशील, व्याजदर व व्याज अनुदान व त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाहीबाबत सविस्तर निर्देश देण्यात आलेले आहेत.

२. सदर योजेनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नगरपरिषद प्रशासन संचनालयामार्फत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून, सर्व आयुक्त, महानगरपालिका व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगर पंचायत यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे व सूचना देण्यात आल्या आहेत.

३. राज्य शासनाच्या दिनांक १६ जून, २०२० च्या शासन निर्णयातील क्र. १६ नुसार PM SVANidhi योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत नगरपरिषंद संचालनायाकडून आणखी सूचना निर्गमित करणे अपेक्षित होते. केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना, राज्य शासनाचा दिनांक १७ जून, २०२० चा शासन निर्णय व तदनंतरच्या कालावधीत उपरोक्त अ.क्र. ३ ते ७ अन्वये केंद्रशासनाकडून प्राप्त सूचना व व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून शहरांशी संवाद साधताना उपस्थित झालेले मुद्दे या अनुषंगाने यासंदर्भात पुढील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

## ४. विविध भागधारकांच्या जबाबदाऱ्या:-

सर्व आयुक्त, महानगरपालिका / मुख्याधिकारी, नगर परिषद/नगरपंचायत यांनी सदर योजनेच्या यशस्वी अंमलबाजवणीकरीता खालील प्रमाणे नियमित बैठका आयोजित कराव्यात.

(अ) **महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायत अंतर्गत पथविक्रेता संबंधित कार्य करणाऱ्या सर्व विभागांची व NULM यांची एकत्रित बैठक आयोजित करणे.**

(i) सदर बैठकीमध्ये ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण झालेले नाही किंवा जे पथविक्रेते सर्वेक्षणामध्ये समाविष्ट होऊ शकले नाही, त्यांना शासन निर्णयायामध्ये नमूद सुचनेनुसार **शिफारस पत्र देण्याबाबत** आलेल्या अर्जाची पडताळणी करण्यासाठी पथविक्रेत्यांशी संबधित बाजार विभाग/मालमत्ता विभाग/वसूली विभाग/Estate Dept./License Dept. यांची जबाबदारी निश्चित करावी.

(ii) PM SVANidhi योजनेसाठी तांत्रिक समन्वयक म्हणून राष्ट्रीय नागरी उपजीविका अंतर्गत कार्यरत असलेले शहर अभियान व्यवस्थापक (CMM-ESTP) व सहाय्यक प्रकल्प अधिकारी हे काम पाहतील. मात्र, त्यांना पथविक्रेत्यांशी संबधित बाजार विभाग/मालमत्ता विभाग/वसूली विभाग/Estate Dept./License Dept. यांचे सहकार्य यांची जबाबदारी निश्चित करावी.

(iii) बँकांशी समन्वय साधण्यासाठी शहर अभियान व्यवस्थापक (CMM-SEP) यांनी काम पहावे.

(iv) या योजनंच्या अंमलबजावणीसाठी सर्व महानगरपालिका आयुक्त यांनी किमान उपायुक्त दर्जाचा अधिका-याची नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी निश्चित करावी. नगरपरिषद / नगरपंचायत स्तरावर संबंधित मुख्याधिकारी हे नोडल अधिकारी राहतील.

(ब) **महानगरपालिका / नगरपरिषद क्षेत्रीय स्तरावर PM SVANidhi अंमलबजावणी समिति स्थापन करणे बैठक आयोजित करणे.**

(i) उपरोक्त संदर्भ २ येथील शासन निर्णयातील ८(ब) नुसार महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत स्तरावर अंमलबाजवणी व सनियंत्रण समिती स्थापन करण्यात यावी.

(ii) या शहर स्तरावरील अंमलबाजवणी व सनियंत्रण समिती या समितीची बैठक घ्यावी. सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा.

(iii) समितीचे सदस्य सचिव हे पथविक्रेताबाबत कार्य करणारे बाजार विभाग/मालमत्ता विभाग/वसूली विभाग/Estate Dept./License Dept. किंवा संबधित विभाग प्रमुख असतील.

(iv) पथविक्रेत्यांना कर्ज त्वरित उपलब्ध होण्यासाठी सदर समितीमध्ये जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक व Non-Banking Finance Company (NBFC) / Micro Finance Institute यांचे प्रतिनिधींचा समावेश समितीमध्ये करण्यात यावा.

(v) पथविक्रेत्यांचे तीन प्रतिनिधी घेण्यात यावे. त्याचबरोबर NULM अंतर्गत स्थापित झालेले शहरस्तर संघ / वस्तीस्तर संघाचे प्रतिनिधी घेण्यात यावे.

**(क) <u>नगर पथ विक्रेता समिती व पथविक्रेता संघटनांची बैठक आयोजित करणे:-</u>**

(i) सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी करण्यासाठी नगर पथविक्रेता समिती व पथविक्रेता संघटना यांचे सहाय्य घेण्यात यावे. त्यासाठी, नगर पथ विक्रेता समिती व पथविक्रेता संघटनांची बैठक आयोजित करण्यात यावी.

(ii) जास्तीत जास्त पथविक्रेत्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी पथविक्रेता समितीने कार्य करावे.

**(ड) <u>सर्व बँक प्रतिनिधींची / कर्ज पुरवठादारांची बैठक आयोजित करणे:-</u>**

(i) राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC) मार्फत सर्व जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक (LDM) यांना योजनेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे सर्व बँकांनीदेखील योजनेच्या अंमलबाजवणीच्या अनुषंगाने परिपत्रक जारी केलेले आहेत.

(ii) शहरातील सर्व बँक प्रतिनिधींच्या बैठकीमध्ये योजना व त्यामध्ये बँकेची भूमिका याची स्पष्टता देण्यात यावी.

(iii) कर्ज पुरवठा करणा-या संस्थेकडे पथविक्रेत्यांच्या ऑनलाईन कर्ज मागणी अर्जावर ५ दिवसामध्ये कार्यवाही करणे आवश्यक आहे, ही बाब त्यांच्या जाणीवपूर्वक निदर्शनास आणावी.

**(इ)** वरील (अ) ते (ड) प्रमाणे बैठका आयोजित करण्यासाठी विविध व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमाचा (उदा. Google meet इत्यादी) यांचा वापर करावा.

## <u>५. पथविक्रेत्याने PM SVANidhi पोर्टलचा (http://pmsvanidhi.mohua.gov.in) वापर करणेबाबत</u>

(अ) सदर योजनेच्या अंमलबाजवणीसाठी केंद्र शासनाने http://pmsvanidhi.mohua.gov.in पोर्टल विकसित केले आहे. सदर पोर्टलवर पथविक्रेत्याने ऑनलाइन अर्ज करावा. पथविक्रेत्याकडे अँन्ड्रॉईड मोबाइल असल्यास त्या माध्यमातून किंवा कॉमन सर्व्हिस सेंटर तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने पुरविलेल्या सुविधेमार्फत (ALF/CLF/CLC) अर्ज करता येईल.

(ब) अर्ज करण्यापूर्वी पथविक्रेत्यांच्या आधारकार्डशी त्यांच्या मोबाइल क्रमांकाची जोडणी (Adhar mobile linking) असणे आवश्यक आहे.

(क) ऑनलाइन अर्ज करण्यापूर्वी पथविक्रेत्यांनी लाभार्थी निकष पूर्ण करीत असलेबाबतचे कागदपत्रे (आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, विक्री प्रमाणपत्र / पथ विक्रेता सर्वेक्षणाचा SRN क्रमांक, बँकेचे पासबुक, ई.) तयार ठेवावे.

(ड) पथविक्रेत्यांचे ऑनलाइन कर्ज प्रस्तावाची प्रक्रिया सदर पोर्टलवर होणार आहे. या पोर्टलवरील अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर **पथविक्रेत्याने अर्ज क्रमांक माहितीसाठी जतन करून ठेवावा**. पथविक्रेत्याला SMS द्वारे अर्जाच्या स्थितीची माहीती वेळोवेळी प्राप्त होईल.

(इ) सदर अर्जाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यावहीसाठी सदर अर्ज https://portal.standupmitra.in/login पोर्टल वर नागरी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच बँकांसाठी उपलब्ध होईल.

(फ) संबंधित पथविक्रेत्याने सदर पोर्टलवर अर्ज करण्या बाबतची कार्यपद्धती सोबतच्या परिशिष्ट “अ” मध्ये देण्यात आली आहे. **सदर पोर्टल वरील पुढील काळात बदल झाल्यास राज्य अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत त्याबाबतची माहिती आपणास कळविण्यात येईल.**

## ६. महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांनी https://portal.standupmitra.in/login पोर्टलचा वापर करणे

(अ) पथविक्रेत्यांनी PMSVANidhi पोर्टलवर ऑनलाइन अर्ज केल्यानंतर सदर अर्जाची माहिती https://portal.standupmitra.in/login या पोर्टलवर महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांना दिसेल.

(ब) महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांचे Verifier व Approver यांचे Login व Password तयार करण्यात आलेले आहेत. ते संबंधित संस्थांना त्यांच्या इ मेल वर Standupmitra पोर्टल मार्फत पाठविण्यात आले आहेत.

(क) महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांनी निश्चित केलेल्या Verifier व Approver यांना Standupmitra पोर्टलवर (https://portal.standupmitra.in/login) अशा दाखल झालेल्या अर्जाची स्थिती पाहता येते. (उदा. Logged, Pickup, Sanction).

(ड) त्याआधारे बँकेशी पाठपुरावा करणे, ज्या पथविक्रेत्यांनी शिफारस पत्राबाबत मागणी केलेली आहे, त्याच्या पडताळणीच्या आधारे शिफारस पत्र देणेबाबतची कार्यवाही करता येते.

(इ) प्रवर्ग “A” अंतर्गत करण्यात आलेले अर्ज हे थेट अर्जदाराने निवडलेल्या बँकेकडे मंजुरीसाठी जातील, तथापि, सदर अर्जाची महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांनी पडताळणी करून प्रस्ताव योग्य असल्याची खात्री करावी.

(फ) प्रवर्ग “B” अंतर्गत करण्यात आलेले अर्ज हे थेट अर्जदाराने निवडलेल्या बँकेकडे मंजुरीसाठी जातील.

(ग) प्रवर्ग “C” व प्रवर्ग “D” अंतर्गत करण्यात आलेले अर्ज हे थेट अर्जदाराने निवडलेल्या बँकेकडे मंजुरीसाठी जातील, तथापि सदर अर्जासाठी **महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांच्याकडून Online स्वरूपात शिफारस पत्र बंधनकारक आहे**. तथापि, **शिफारस पत्र Offline स्वरूपात देण्यात येऊ नये**.

(घ) सदर शिफारस पत्राबाबत संबंधित बँकेकडून महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांना पोर्टल द्वारे Online स्वरूपात शिफारस मागणी अर्ज प्राप्त होईल. या पत्रामधील मुद्दा क्र. ४ (i) नुसार जबाबदारी निश्चित केलेल्या अधिकाऱ्याद्वारे १५ दिवसांच्या मुदतीत अर्जाची पडताळणी करून पोर्टलवर Verifier व Approver च्या माध्यमातून शिफारस पत्राबाबत निर्णय घेतील.

(च) सदर पोर्टल वरील पुढील काळात बदल झाल्यास राज्य अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत त्याबाबतची माहिती आपणास कळविण्यात येईल.

## ७. कर्ज पुरवठा संस्था ( बँक, एमएफआय, एनबीएफसी) यांनी https://portal.standupmitra.in/login पोर्टलचा वापर करणे

(अ) कर्ज पुरवठा करणा-या संस्था यांना देखील सदर पोर्टलचे Login व Password देण्यात आलेले आहेत. त्याद्वारे पथविक्रेत्यांचे कर्ज मंजूर करणे, महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांच्याकडे शिफारस पत्रासाठी मागणी करणे तसेच कर्ज वितरीत करणे इत्यादि कार्यवाही करण्यात येते.

(ब) वरील सर्व प्रवर्गातून थेट बँकेकडे प्राप्त झालेल्या अर्जावर संबंधित बँक पाच दिवसांच्या मुदतीमध्ये निर्णय घेईल. अन्यथा सदर कर्ज मागणी अर्ज इतर कर्ज पुरवठा संस्थांसाठी (Market Place) उपलब्ध होईल.

(क) वरील प्रमाणे कर्ज मागणी अर्जावरील पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच कर्ज पुरवठा संस्था संबंधित पथविक्रेत्याच्या खात्यावर कर्ज वितरित करेल. या सर्व प्रक्रियेची माहिती SMS द्वारे पथविक्रेत्यास प्राप्त होईल.

## ८. Common Service Center ची सुविधा उपलब्ध करणे व त्याबाबतचे दर

(अ) PM SVANidhi योजनेच्या मार्गदर्शक सुचनेमध्ये कर्ज प्रस्तावाची प्रक्रिया ऑनलाइन वेब पोर्टलनुसार (http://pmsvanidhi.mohua.gov.in) होणार आहे. कर्जाचा अर्ज आणि शिफारस पत्रासाठी अर्ज यासाठी सदर ऑनलाइन अर्ज संपूर्ण भरणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती देखील अपलोड करणे आवश्यक आहे.

(ब) त्यामुळे पथविक्रेत्यांना ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया करण्यामध्ये अडचण येऊ शकते. त्याकरिता सदर पथविक्रेते यासाठी Common Service Center, नागरी सुविधा केंद्र, सेतु सुविधा केंद्र इ. ची मदत घेऊ शकतात. तसेच, सदर सेवा NULM अंतर्गत स्थापित SHG/ALF/CLF/CLC या पुरवीत असतील तर त्यांच्यमार्फत देखिल पुरविता येईल. या करिता उपरोक्त संदर्भ ४ नुसार पथविक्रेताचा PMSVANidhi अंतर्गत ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी जास्तीत जास्त रु.५०/- आकारू शकतात.

(क) याबाबत संबधित उपायुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत यांनी अशा केंद्राची बैठक घेऊन ऑनलाइन अर्ज भरण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करावे व इच्छुक पथविक्रेत्यांना Common Service Center, नागरी सुविधा केंद्र, सेतु सुविधा केंद्र इ. ची सेवा उपलब्ध करून द्यावी. त्यामध्ये काही अडचणी असल्यास त्या सोडवाव्यात.

(उ) वरील (ब) प्रमाणे सेवा उपलब्ध नसल्यास महानगरपालिका / नगरपरिषद/नगरपंचायतीमार्फत help desk सुरु करून पथविक्रेत्यांना ऑनलाइन अर्ज करण्यासाठी व्यवस्था करण्यात यावी. याकरिता स्मार्ट सिटी डेटा सेंटर, VTP यांचीही मदत घेता येईल.

## ९. पथविक्रेत्यांचे समान हितसंबंधी समूह {Common Interest Groups (CIG) } तयार करणे

(अ) उपरोक्त संदर्भ २ मधील शासन निर्णयातील क्र. १० नुसार पथविक्रेत्यांचे समान हितसंबंधी समूह {Common Interest Groups (CIG) } तयार करण्यात यावे.

(ब) सदर समूह स्थापनेमुळे व्यवसायासाठी वैयक्तिक किंवा समूहाला औपचारिक कर्ज पुरवठा करणा-या संस्थां या सामुदायिक गटांना कर्ज वितरीत करतात. याचा फायदा समूहाला होतो व कर्जाची नियमित परतफेड देखील होते. पथविक्रेते समुहामुळे एकत्रित येऊन आपला व्यवसाय वाढविण्यासाठी त्याचा फायदा होतो. समुहामुळे शासनाच्या विविध प्रकारच्या सामाजिक सुरक्षितता आणि कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणे सुलभ होते.

(क) उपरोक्त संदर्भ ३ नुसार पथविक्रेत्यांचे समान हितसंबंधी समूह {Common Interest Groups (CIG) } गठित करण्यासाठी सदर पथविक्रेते हे एकाच वॉर्ड, फेरीवाला क्षेत्रामधील असावेत. समूहामधील सर्व पथविक्रेत्यांचा व्यवसाय / सेवा एक सारखी असावी. एका समूहामध्ये ५ ते २० सदस्य असू शकतात, परंतू, शक्यतो १० सदस्य असावेत. समूहातील पथविक्रेत्यांकडे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने / नगर पथविक्रेता समितीने दिलेले विक्री प्रमाणपत्र/तात्पुरते विक्री प्रमाण पत्र, ओळख पत्र / शिफारस पत्र असले पाहिजे. एका समूहामध्ये पुरुष/महिला/तृतीयपंथी/दिव्यांग ई. विविध प्रकारच्या पथविक्रेत्यांचा समावेश करता येईल.

(ड) समान हितसंबंधी समूह{Common Interest Groups (CIG)}च्या दर पंधरवडा बैठक आयोजित कराव्यात. समूहाने आपले बँकेत बचत खाते उघडावे. समूहाने बैठकीमध्ये आपल्या समूहाचा अध्यक्ष व सचिव निवडावा. दर महिन्याला प्रत्येक समूह सदस्याने रु. १००/- बचत समुहामध्ये जमा करावी. समुहाच्या बैठकीमध्ये गरजवंत सदस्याला त्याच्या गरजेची खात्री करून सर्व सदस्यांच्या सहमतीने कर्ज वाटप करावे. समूहातील सदस्यांनी दर महिन्याला नियमित बचत, ठरविण्यात आलेली मुद्दल व व्याजची परतफेड करावी. समूहातील सर्व सदस्यांसमोर बैठकीतील सर्व आर्थिक व्यवहारांची नोंद समूहाच्या नोंदवहीमध्ये ठेवावी.

(इ) पथविक्रेत्यांचा समूह किंवा समूहातील वैयक्तिक पथविक्रेता कर्ज पुरवठा करणा-या संस्थेकडे प्रस्ताव सादर करतील.

## १०. पथविक्रेत्यांना डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देणे:-

(अ) पथविक्रेत्यांनी डिजिटल माध्यमातून व्यवहार केल्यास त्यांना कॅशबॅकची सुविधा असणार आहे.

(ब) डिजिटल पेमेंट माध्यमांचा वापर केल्यास रु.५० ते रु. १०० कॅशबॅक मिळेल. त्यासाठी एकवेळेस कमीत कमी २५ रुपयांचे डिजिटल व्यवहार करणे आवश्यक आहे.

(क) संदर्भ क्र. ६ च्या पत्रान्वये Paytm, Bharatpay, Amazonpay, Phonepay, PaySwiff, Mswipe व Ftcash ई. यांनी पथविक्रेत्यांना विनामूल्य onboard करण्यासाठी सहमती दर्शविलेली आहे. त्यांची यादी pmsvanidhi.mohua.gov.in या पोर्टलवर Payment Aggregator या ठिकाणी आहे व संबधित संपर्क व्यक्ती व त्यांचा संपर्क क्रमांक देण्यात आलेला आहे. पथविक्रेत्यांपर्यंत सदर माहिती पोहचविण्यासाठी प्रचार प्रसिद्धी करण्यात यावी.

## ११. योजनेचा प्रचार व प्रसिध्दी

(अ) "प्रधान मंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SWANidhi)" पथविक्रेत्यांसाठी विशेष सूक्ष्म पतपुरवठा सुविधा योजनेची विविध माध्यमातून प्रचार प्रसिध्दी करण्यात यावी.

(ब) यासाठी वृत्तपत्रामध्ये बातमी देणे, शहरातील मुख्य ठिकाणावर योजनेच्या माहितीचे बॅनर लावणे, पॉम्पलेट तयार करून ते वाटणे व विविध सामाजिक माध्यमांच्या (Social Media) सहाय्याने योजनेची प्रचार प्रसिध्दी करणेत यावी. उपरोक्त संदर्भ ६ च्या पत्रान्वये Branding and Communication Guidelines देण्यात आलेल्या आहेत, त्या पत्रासोबत जोडलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी.

(क) उपरोक्त संदर्भ ७ नुसार ऑल इंडिया रेडिओ व FM station वर प्रसारीत होणा-या रेडिओ जिंगल्स याची माहिती देण्यात आलेली आहे. त्याचाही उपयोग सदर योजनेच्या प्रचार प्रसिद्धी करीता करावा. सदर पत्रासोबत त्याची माहिती जोडलेली आहे. प्रचार प्रसिध्दीकरीता राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानमधील IEC या घटकमधून खर्च करता येईल.

**१२. माहिती प्रणाली व्यवस्था (MIS) मध्ये माहिती नोंदविणे :-**राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत नागरी पथविक्रेत्यांना सहाय्य घटकामध्ये सदर समान हितसंबंधी समूह{Common Interest Groups (CIG) }ची माहिती, व्यवसायाचा प्रकार, सदस्यांची माहिती, कर्जाची स्थिती इत्यादी माहितीMIS मध्ये नियमितपणे नोंदवावी.

**१३. लाभार्थी उद्दीष्ट:-** या योजनेअंतर्गत दर आठवड्याला नगर परिषद/नगरपंचायत यांनी किमान ५० तर ड वर्ग महानगरपालिकेने किमान २०० पथविक्रेत्यांचे कर्ज मागणीचे ऑनलाइन अर्ज करण्याचे उद्दीष्ट राहील. क वर्ग महानगरपालिकांनी दर आठवडयांला किमान ५०० कर्ज मागणीचे ऑनलाइन अर्ज करण्याचे उद्दीष्ट

राहील. इतर महानगरपालिकांनी त्यांच्या क्षेत्रातील पथविक्रेत्यांच्या संख्येच्या १५ टक्के इतके अर्ज प्रत्येक आठवडयास सादर होतील असे उद्दीष्ट ठेवावे. ही प्रक्रिया सतत चालू राहील.

**१४. योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी :-** या योजनेतील लाभार्थ्यांना उपरोक्त मार्गदर्शक सूचनानुसार व दिनांक १७.०६.२०२० च्या शासन निर्णयानुसार "प्रधान मंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SWANidhi)" पथविक्रेत्यांसाठी विशेष सूक्ष्म पतपुरवठा सुविधा योजनेची अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आयुक्त, महानरगपालिका व मुख्याधिकारी, नगर परिषद नगर पंचायत यांची राहील.

**१५. अहवाल सादर करणे :-** सदर योजनेच्या अंमलबाजवणीचा प्रगती अहवाल दर महिन्याला पोर्टलवर व मेलद्वारे सादर करण्यात यावा.

१६/०७/२०२०

(पां. जो. जाधव)
आयुक्त तथा संचलक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

सहपत्रे :- वरीलप्रमाणे

प्रत,

उप सचिव (नवि-२०) नगर विकास विभाग, मंत्र्यालय, मुंबई ३२
कक्ष अधिकारी (नवि-२०) नगर विकास विभाग, मंत्र्यालय, मुंबई ३२
उप संचालक (का.११) नगरपरिषद प्रशासन संचालनालय
सहायक संचालक (का.११) नगरपरिषद प्रशासन संचालनालय
सर्व प्रादेशिक उपसंचालक, नगर परिषद प्रशासन
सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी



Scanned with CamScanner